# अण्णासाहेबांच्या रामराज्य वियोगातील प्रायोगिकता

**कमलाकर नाडकर्णी**

शताब्दीच्या सोहळयाला नाट्यसंमेलनाने पितामहांना वंदन करून प्रगतीचे प्रस्थान मांडले पाहिजे. मराठी रंगभूमीचे श्रीफळ विष्णूदास भाव्यांनी फोडले असले तरी मराठी नाट्याचा डोळसपणे वापर करून सामाजिक प्रतिष्ठेचा रंगभूमीला लाभ करून देणारे म्हणून अण्णासाहेब अर्थात बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांचेच नाव द्यावे लागेल. 'संगीत सौभद्र' सारखे अवीट गोडीचे प्रसन्न नाटक एकमेवाद्वितीयच, पण आजही पुरोगामी विचारांचे, लक्षणीय व्यक्तिरेखांचे संस्मरणीय नाटक म्हणून 'रामराज्यवियोग' याच नाटकाचा उल्लेख करावा लागेल. अण्णांचे हे अपूर्ण राहिलेले तीन अंकी नाटक पूर्ण झाले असते तर सुबोध पद्यरचना, प्रवाही संवादभाषा, विलक्षण वेगळे स्वभावचित्रण, चमत्कृतीजन्य तितकीच प्रतिभावान, रचना आणि पौराणिक, पारंपारिक कथाभागातून अत्यंत प्रभावी प्रागतिक विचार मांडणारे हे एक श्रेष्ठ नाटक ठरले असते. नाट्यवाङ्मयाचा एक मानदंड झाले असते.

विशेष म्हणजे 'रामराज्यवियोग' हे नाटक केवळ वाचनीय नाही, फक्त ग्रंथालयाची शोभा वाढवणारे नाही, तर त्याचे प्रयोगमूल्यही तेवढेच समर्थ आहे. १८८४ साली रंगमंचावर आलेल्या या नाटकाच्या कर्त्याची ही नाट्यजाण पाहिली म्हणजे त्यांना द्रष्टा नाटककार म्हटल्यावाचून गत्यंतरच राहत नाही.

विष्णूदास भाव्यांची रूळलेली वाट अव्हेरून, संकेतांची मोडतोड करून, त्यांच्या आधीन न जाता नाट्याला आवश्यक अशा रीतीने त्यांना वळवून घेणाऱ्या या नाटकाला १८८४ सालातलेच काय पण आजचेही प्रायोगिक नाटकच म्हणायला हवे!

अन्य पर्याय असताना व अर्थप्राप्तीचीही संधी असताना अण्णांनी रामायणातील पूर्वकांडातील हे रामराज्यवियोगाचे कथानक हेतुतः निवडले होते. या कथाभागात ओतप्रोत नाट्यात्मकता आहे हे त्यांच्या अभ्यासू, जाणकार नजरेने नेमके ताडले होते.

या नाटकाच्या लेखनासंबंधी त्यांच्या चरित्रात नमूद केलेल्या माहितीवरून नाटककार म्हणून त्यांचे श्रेष्ठत्व व त्यांची नाट्यविषयाची निष्ठा सहज समजून येते.

इंदूरचे युवराज शिवाजीराव हे 'शाकुंतल' व 'सौभद्र' या नाटकांवर बेहद्द खूष होते. ते रसिक व संस्कृत प्रेमी असल्यामुळे त्यांनी अण्णांना 'मालतीमाधव' चे मराठी रूपांतर करण्याचा आग्रह केला. इंदूरकर अण्णांच्या गुणांवर एवढे लुब्ध झाले होते की त्यांनी अण्णांना व भाऊरावांना अनुक्रमे दरमहा रु. ६० व रु. ४० च्या कायमच्या नोकऱ्या दिल्या होत्या. श्रीमंतांच्या इच्छेनुसार 'मालतीमाधवाचे' रूपांतर केले असते तर उत्तम द्रव्यलाभ झाला असता यात शंकाच नाही. पण अण्णांच्या लेखी द्रव्यापेक्षा नाट्यात्मकता महत्त्वाची होती. (प्रायोगिकत्वच) त्यांनी राजांच्या सूचनेचा किंचितही विचार न करता रामराज्यवियोगाचाच घाट घातला. अण्णांच्या मृत्यूपुर्वीची शेवटची भूमिका ही रामराज्यवियोगातल्या दशरथाचीच.

किर्लोस्कर संगीत मंडळींने या नाटकाचा पहिला प्रयोग २० ऑक्टोबर १८८४ रोजी पुणे येथे केला. बळवंत संगीत मंडळीने १९२३ साली चिंतामणराव कोल्हटकर यांनी पूर्ण केलेल्या पाच अंकी 'रामराज्यवियोग' चा प्रयोग बेळगांव येथे केला. या प्रयोगात मा. दीनानाथ यांनी रामाची भूमिका साकारली होती, तर जोशी राजा दशरथ झाले होते. शंबुकाची